



साप्ताहिक

www.dongarcharaja.com

वडवणी तालुक्यातील पहिले मराठी वृत्तपत्र

# डोंगरचा राजा

संपादक : अनिल वाघमारे






■ वर्ष १० ■ अंक ३९ ■ बुधवार, दि. २ एप्रिल २०२५ ■ RNI No. : MAHMAR/2015/62614 ■ पोस्टल परवाना : L. SB/Beed/RNP-219/2024-2026 ■ email:dongarcharaja@gmail.com ■ पाने ४ ■ किंमत १ रु.


# मोठे संकट...मोठे यश!

## अतिक्रमण हटविण्यास स्तुर्तास स्थगिती;कुरेशी कुटुंबाने केलं होतं अपील

वडवणी : प्रतिनिधी

वडवणीकरांच्या मनातलं बस स्थानकाचं स्वप्न पूर्ण होण्याची घटिका धुळीस मिळाली की काय? असा सवाल आता नागरिक करु लागले आहेत. कारणही तसेच म्हणावे लागेल सदर जमिनीवर हक्क गाजवणारे कुरेशी बंधूंनी न्यायालयात धाव घेऊन या ठिकाणचे अतिक्रमण प्रशासन काढू शकत नाही. असा दावा न्यायालयात दाखल केला होता. त्या दाव्याला न्यायालयाने मंजुरी देत वादी च्या अर्थात कुरेशी बंधूंच्या मिळकतीवर प्रशासनाने कोणत्याही प्रकारे हरकत अडथळा करू नये असा तूर्तास मनाई आदेश कुरेशी बंधुना देण्यात आला आहे. त्यामुळे हार कर जितने वालों को बाजीगर कहते हैं असं म्हटलं तर वावगं ठरणार नाही.

वडवणी शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या प्रशासनाच्या म्हणण्यानुसार ज्या ठिकाणी कुरेशी बंधूंनी अतिक्रमण केले आहे. त्या ठिकाणचे अतिक्रमण काढण्यासाठी जिल्हा,उपविभाग, अन्? तालुका प्रशासन कामाला लागले होते. वडवणी शहरासह तालुकाभरात या अतिक्रमणाची चर्चा अगदी ठिकठिकाणी केली जात होती. अतिक्रमण काढले जाईल.? मग या ठिकाणी कोणतं कार्यालय आणि काय होईल.? याची उत्सुकता सगळ्यांनाच होती. परंतु या जमिनीवर हक्क गाजवणारे व कोर्टात धाव घेणारे सर्वश्री हमीद कुरेशी,मजीद कुरेशी,बिलाल कुरेशी,अब्दुल रहीम कुरेशी यांचे वारस,नसरीन बानू कुरेशी,अब्दुल्ला कुरेशी, अहमद कुरेशी,रशीद कुरेशी, शिराज कुरेशी,शाकीब कुरेशी, तौफिक कुरेशी,साजेदा कुरेशी, फरिण कुरेशी,शाहीन कुरेशी सर्व राहणार वडवणी यांनी माजलगाव येथील दिवानी न्यायालय वरिष्ठ स्तर येथे अर्ज सादर करत गट क्रमांक ६५६ चे मूळ टिपणअभिलेख सुमारे वीस वर्षांपूर्वी केव्हा तरी गहाळ झालेली असून त्याचा गैरफायदा घेऊन प्रशासन आमच्या विरोधात राजकीय दबावापोटी कायदेशीर मालकी व ताब्याच्या वादग्रस्त मिळकतीवरून बेदखल करत शासनाच्या ताब्यात घेण्याचा प्रयत्न करत आहे. त्यामुळे गट क्रमांक ६५६ च्या हद्दी ,खुना होणार म्हणून आम्हा कोणालाही कोणत्याही नोटीसा न देता तसेच त्याबाबत आमची कोणतीही कायदेशीर बाजू ऐकून न घेता मालकी व ताब्याच्या वादग्रस्त जमिनीमध्ये कायम करून आम्हाला भेदखल करून वादग्रस्त मिळकतीवर बेकायदेशीरपणे अतिक्रमण करून बळकवण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यासाठी आम्ही सर्वांनी एकमेकांशी संगनमत केले आहे.




### ॲड.एस.सी.शर्मा अन् ॲड.एन.आर.लंगडे यांचे कौतुक..

वडवणी येथील गायरान जमीन गट नंबर ६५६ चा पश्चिम बाजूने गट नंबर ६५८ आहे. सरकारचे म्हणणे आहे की गट नंबर ६५८ चा शेतकऱ्याने गट नंबर ६५६ मधील गायरान जमीनवर अतिक्रमण करून पत्र्याचे गाळे काढली आहेत. सदर गाळे काढून टाका म्हणून सरकार प्रशासन प्रयत्न करत असल्यामुळे गट नंबर ६५८ मधील भू धारक कुरेशी कुटुंबाने माजलगाव येथील वरिष्ठ न्यायालयात सरकार विरुद्ध दिवाणी दावा दाखल करून त्या मध्ये सरकारने त्यानी बांधलेल्या पत्र्याच्या गाळ्याला काही करू नये म्हणून मनाई हुकूम मागीतला आहे. मा.न्यायालयाने दोन्हीही बाजूचे म्हणे ऐकून कागदपत्र पाहून प्रकरणात वादी ने मागितलेला मनाई हुकूम मंजूर केला असल्याची माहिती गट नंबर ६५८ मधील शेतकऱ्याकडून काम पहाणारे ॲड.एस.सी.शर्मा आणि ॲड.एन.आर.लंगडे यांनी दिली. निश्चितच कुरेशी कुटुंबाची बाजु लाऊन धरत त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी जे प्रयत्न ॲड.एस.सी.शर्मा अन्? ॲड.एन.आर.लंगडे यांनी केले आहेत. त्यामुळे या दोन्ही वकिलांचे विशेष कौतुक केले जात आहे.

आम्हाला विश्वसनीय सूत्रांकडून माहिती देऊन सांगितले की तुम्हाला कोणतीही माहिती न देता, तुमच्या मालकी व ताब्याच्या वादग्रस्त जमीनीमध्ये सर्व प्रशासकीय अधिकारी कर्मचारी हे बेकायदेशीरपणे गट क्रमांक ६५६ च्या हद्दी खुना कायम करत असून वादग्रस्त जमीन ताब्यात घेण्याचा प्रयत्न करत आहेत. हेच शासकीय अधिकारी, कर्मचारी पोलीस फोर्स घेऊन वाद मिळकतीमध्ये आमच्या मालकी व ताब्यात हरकत व अडथळा करून वाद मिळकत अनाधिकृत व बेकायदेशीरपणे ताब्यात घेण्याचा प्रयत्न करत आहेत. येथील स्थानिकच्या पुढार्यांशी संगणमत करून त्यांच्या प्रोत्साहनावरून आमचे विरुद्ध कारवाई करण्याच्या तयारीत असल्याचे माहिती मिळुन आलेली आहे. त्यामुळे आम्हाला यापासून धोका निर्माण झाला आहे. आमच्या मिळकतीवरील कायदेशीर मालकी व ताब्याला हरकत अडथळा करण्यापासून तूर्तास त्यांना प्रतिबंधित करणे जरुरी असल्याचे माहिती न्यायालयात सादर केली. कोर्टाने दाव्याच्या निकालापर्यंत अंतरिम मनाई आदेश तसेच जैसे थे आदेश पारित करणे जरुरी आहे. असे शपथपत्र दाखल करण्यात आले होते.कोर्टाने देखील प्रशासनातील एक ते पाच अथवा त्यांच्यातर्फे इतर कोणीही दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत दावा मिळकत म्हणजेच गट क्रमांक ६५८ मधील ५९.५४ गुंठे मिळकती वरील वादीच्या ताब्याला कोणत्याही प्रकारे हरकत अडथळा करू नये असा अर्थात प्रशासनाच्या विरुद्ध तुर्तास मनाई आदेश देण्यात आला आहे. त्यामुळे निश्चितच कुरेशी कुटुंबातील सदस्यांनी आम्हाला न्याय मिळाला पाहिजे ही भूमिका समोर ठेवून प्रयत्न करत राहीले होते. आम्ही हरलो आहोत हे तर त्यांनी मनात सुद्धा आणलं नाही. न्याय व्यवस्थेवर विश्वास असल्याने आम्हाला न्याय मिळाला आहे अशा भावना कुरेशी कुटुंबाने व्यक्त केल्या.



## सर्वपरिचित,मनमिळावू अन् कर्तव्यदक्ष पोलिस उपनिरीक्षक काशिनाथराव राठोड सेवानिवृत्त

वडवणी:प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यात सर्वपरिचित असणारे मनमिळावू अन् कर्तव्यदक्ष पोलिस उपनिरीक्षक काशिनाथराव राठोड हे आपली पोलिस प्रशासनातील सेवा पुर्ण करुन आज सेवानिवृत्त होत आहेत. सर्वांकडून या त्यांच्या सेवावृत्ती नंतरच्या वाटचालीसाठी त्यांना सर्वस्तरातून शुभेच्छा दिल्या जात आहेत.**

काशिनाथराव शाहूराव राठोड यांचे मुळगाव भवानवाडी तांडा तालुका बीड जिल्हा बीड सध्या ते वास्तव्यास बीड शहरामध्ये असून त्यांचा जन्म १९६७ साली झाला. शालेय शिक्षण पहिली ते दुसरी त्यांच्या मुळ गावीच झाले.आणि तीन ते सात पर्यंत पोखरी येथील शाळेमध्ये व आठ ते दहा पर्यंत शिवनी हायस्कूल या ठिकाणी झालं. महाविद्यालय शिक्षण हे बीडच्या केएसके कॉलेज या ठिकाणी झाले. कुटुंबाची परिस्थिती जेमतेम, व्यवसाय म्हणाल तर शेती,कुटुंबात शेती हाच प्रमुख व्यवसाय म्हणून वडिलांनी शेती जोपासली. भाऊ सुद्धा शेतीचा करतो. श्री.काशिनाथराव राठोड हे १५/ २/ १९८८ मध्ये पोलीस सेवेत रुजू झाले. सुरवातीला धारूर पोलिस स्टेशन पाच वर्ष, माजलगाव पोलिस स्टेशन मध्ये चार वर्षे,वडवणी पोलीस चौकी होती त्यावेळी तिथे सहा वर्ष, त्याचबरोबर तलवाडा पोलिस स्टेशन या ठिकाणी तीन वर्ष, सिरसाळा या पोलीस स्टेशनमध्ये सहा वर्ष आणि परत वडवणी पोलीस स्टेशनला पाच वर्ष सेवा दिल्या नंतर त्यांना पोलीस उपनिरीक्षक पदावर बढती मिळाली. पोलिस उपनिरीक्षक म्हणुन त्यांनी पोलीस मुख्यालयामध्ये पाच वर्ष सेवा दिली. असा त्यांचा ३७ वर्षाचा सेवाकाल आज संपतोय. ३१ मार्च २०२५ ला ते सेवानिवृत्त होत आहेत. निश्चितच त्यांनी आपल्या शासकीय सेवेमध्ये उत्कृष्ट असं



योगदान देत पोलीस प्रशासनामध्ये अत्यंत प्रमाणे आणि मनमिळावू व्यक्तिमत्त्व म्हणून बीड जिल्ह्यातील जनतेकडून त्यांच्याकडे पाहिलं जातं. ३७ वर्षाच्या आपल्या सेवेमध्ये कोणताही धब्बा न लागता. अत्यंत प्रामाणिक सेवा दिली. ज्या ठिकाणी त्यांनी सेवा दिली त्या ठिकाणी वरिष्ठ अधिकारी असतील अथवा सहकारी कर्मचारी असतील कोणाचाही अपमान होईल असे ते वागले नाही. त्यांची वागणूक अत्यंत चांगल्या प्रकारे सर्वांनाच मिळाली. म्हणूनच सर्वांना ते आपले स्नेही करण्यात निश्चितच यशस्वी झाले.या सोबतच त्यांनी सलोख्याचे संबंध ठेवण्यावर भर दिला. गोरगरिबांना सदैव साथ देणारे अधिकारी म्हणून काशिनाथराव राठोड यांची ओळख निर्माण झाली. त्यांच्या कुटुंबात पत्नी, दोन मुले एक मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या मुलीचा विवाह स्नेही मंडळीच्या साक्षीने २०१६ मध्ये पार पडला. मुलींचे उच्च शिक्षण झाले असून मोठा मुलगा स्वप्निल राठोड हा सिव्हिल इंजिनिअर असून तो अल्ट्राटेक सिमेंट कंपनीमध्ये जॉब करतो आहे. त्याचबरोबर किरण राठोड हा लहान मुलगा मुंबई पेट्रो केमिकल इंजिनिअर म्हणून आपला जॉब करतोय. असा परिवार पोलिस उपनिरीक्षक काशिनाथराव राठोड यांचा आहे. आई-वडिलांना सर्वस्व मानणारे काशिनाथराव राठोड हे वडिलांच्या तत्त्वावर आजही मार्गक्रम करत आहेत. त्यांचा लहानपणीचा कार्यकाल म्हणजेच पोलीस भरती होण्यापूर्वीचा एक कुस्तीपटू म्हणून ते गावोगावी यात्रेतील कुस्ती फड गाजवत असत. वडिलांना आपला मुलगा पैलवान व्हावा म्हणून काशिनाथरावांनाही कुस्तीची आवड होती. महाविद्यालय व आंतरमहाविद्यालयीन विद्यापीठा पर्यंत कुस्ती स्पर्धेत भाग घेतला. ती आवड त्यांनी जोपासली. ज्यांनी त्यांना घडवलं अशा आई-वडिलांना ते आपल्या जीवनाच्या कारकीर्दीचे श्रेय देत असल्याची माहिती त्यांनी दिली. पोलीस स्टेशनला सेवा देत असताना आपल्या ३७ वर्षाच्या सेवेत अनेक वेळा आणीबाणीच्या वेळी देखील वरिष्ठांनी सोपवलेली जबाबदारी अत्यंत चोखपणे बजावण्याची भूमिका काशिनाथराव राठोड यांनी पार पाडली. आज ते आपल्या पोलिस सेवेतून अर्थात पोलिस उपनिरीक्षक पदाची सेवा पुर्ण करुन सेवानिवृत्त होत आहेत. निश्चितच श्री काशिनाथ राठोड यांना पुढील वाटचालीसाठी आमच्या देखील शुभेच्छा.

## आता मशाल पेटणार

### विनायक मुळे जनता दरबार भरवणार

वडवणी : प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील विविध प्रश्नांसाठी आता उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना कामाला लागली असून तालुक्यातील शेतकरी,शेतमजूर ,निराधार त्याचबरोबर इतर लाभार्थ्यांच्या हितासाठी शिवसेना तालुकाप्रमुख विनायक मुळे यांनी आपली मशाल पेटवली असल्याचे चित्र आता दिसत आहे.

तालुकास्तरावर प्रशासनाच्या अधिकाऱ्यांना जाब विचारून लाभार्थ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी जनता दरबार भरवणार असल्याचे माहिती डोंगरचा राजा ला शिवसेना तालुकाप्रमुख विनायक मुळे यांनी दिली आहे.



याबाबत अधिक माहिती अशी की वडवणी तालुक्याच्या विविध प्रश्नांबरोबरच तालुक्यातील मायबाप जनतेच्या ज्या शासनाच्या योजना असतील शेतकरी बंधू भावांच्या ज्या काही समस्या असतील ज्या कार्यालयातून अडचणी निर्माण होत आहेत अशा कार्यालयाच्या अधिकाऱ्यांना जाब विचारण्या बरोबरच त्या प्रश्नांची जाग्यावरच सोडवणूक करण्याच्या प्रमुख उद्देशाने वडवणी या तालुक्याच्या ठिकाणी लवकरच महाविकास आघाडीचे खासदार बजरंग सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली व शिवसेना जिल्हाप्रमुख गणेश वरेकर, माजलगाव विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे नेते मोहनराव जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत तालुक्यातील सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी महत्त्वाचे अधिकारी व कर्मचारी ज्यांच्याकडून या प्रश्नांची सोडवणूक करणे सोईचे होईल असे तहसीलदार , गटविकास अधिकारी, तलाठी, मंडळ अधिकारी, ग्रामसेवक, राष्ट्रीयकृत बँकेचे मॅनेजर, महाराष्ट्र ग्रामीण बँक मॅनेजर, रजिस्ट्री ऑफिस, आरोग्य विभाग, यांच्या सह सर्व सहकारी ऑफिस, अधिकारी, कर्मचारी हे देखील उपस्थित असणार आहेत. त्यामुळे तालुक्यातील तमाम शेतकरी, शेतमजूर, निराधार आणि ज्यांचे प्रश्न प्रलंबित आहेत अशा सर्व नागरिकांनी या जनता दरबारात आपलं म्हणणं मांडायला आवश्य यावं असं आवाहन शिवसेना तालुकाप्रमुख विनायक मुळे यांनी डोंगरचा राजा च्या माध्यमातून केले आहे.

## राजकुमार करडेचा प्रेम प्रकरणातून खून

### अंबाजोगाईत:आईच्या फिर्यादीवरून तिघाविरुद्ध गुन्हा दाखल

अंबाजोगाई : प्रतिनिधी

प्रेमाला जात आडवी येत नाही म्हणतात मात्र प्रेम प्रकरणातूनच आपला मुलगा राजकुमार करडे वय २५ वर्ष याचा वेदांत शिंदे आदिनाथ भांडे व एक अनोळखी अशा तिघांनी कोयत्याने काठीने मारहाण केल्याने आपल्या मुलाचा खून झाला असल्याची फिर्याद मयताची आई केशाबाई करडे यांनी दिल्यावरून वरील तिघा विरुद्ध अंबाजोगाई शहर पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे

फिर्यादीत मयताची आई म्हणते आपला मुलगा मागील दोन वर्षापासून शॉर्ट फिल्म बनवत



होता यादरम्यान त्या मुलीचे प्रेम संबंध जुळले होते मुलगा सतत म्हणत होता आम्ही लग्न करणार आहोत मात्र मुलीचे वडील लग्नाला विरोध करत आहेत असे मुलगा सतत आपल्याला सांगत होता काल सकाळी साडेअकरा वाजता फोन आला तुमच्या मुलाला मारले तो शासकीय रुग्णालय उपचार घेत आहे

तातडीने आपण रुग्णालयात गेल्यानंतर जखमी अवस्थेत असताना मुलाला विचारले कोणी मारले वरील तिघांनी मारल्याचे मुलाने सांगितले अधिक माहिती घेतली असता आपला मुलगा राजकुमार करडे पोखरी रोडवरील हॉटेल वृंदावन येथे सकाळी सव्वानऊ वाजता बसला असता वैजनाथ शिंदे यांच्या सांगण्यावरून तिघांनी कोयता काठीने डोक्यात छातीवर गळ्यावर हातावर शरीरावर वार करून मुलाला गंभीर जखमी केले त्यामुळे वैजनाथ शिंदे वेदांत शिंदे आदिनाथ भांडे सर्व राहणार सारडा नगरी अंबाजोगाई व अनोळखी एक जण यांच्याविरुद्ध तक्रार असल्याचे म्हटले आहे पोलिसांनी वैजनाथ शिंदे वेदांत शिंदे आदिनाथ भांडे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे अंबाजोगाई शहर परिसरात गुन्हेगारीच्या घटनेत वाढ झाल्याने पोलिसांच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह लागत आहे

## संपादकीय

# वचनांचा विसर!

निवडणुकीच्या काळात मुक्त हस्ताने दिलेल्या आश्वासनांमधून गळयात पडलेल्या विजयाच्या हारतुऱ्यांचे आता पाश बनल्याचा अनुभव महायुतीच्या नेत्यांना येत आहे. लाडकी बहीण योजनेच्या लाभार्थींना दरमहा २१०० रुपये देण्याच्या विषयातून राज्य सरकारने नुकतीच 'सन्मानजनक' माघार घेतली; तीच वेळ शेतकऱ्यांच्या कर्जमाफीबाबत आली आहे. 'सध्या राज्याची आर्थिक स्थिती पाहता कर्जमाफी शक्य नाही, इतकेच नव्हे तर पुढील तीन वर्षे कर्जमाफी करता येणार नाही,' असे अर्थ खात्याची जबाबदारी पाहणारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगून टाकले. पवार हे स्पष्ट आणि सडेतोड बोलण्यासाठी प्रसिद्ध आहेत. फक्त निवडणुकीपूर्वी त्यांचा हा सडेतोड बाणा कुठे हरवतो, हा प्रश्न आहे. निवडणुकीपूर्वी राज्यात त्यांचेच सरकार होते.

महायुतीच्या निवडणुकीच्या जाहीरनाम्यात लाडक्या बहिणींना दरमहा २१०० रुपये देण्यापाठोपाठ शेतकरी कर्जमाफी, शेतकरी सन्माननिधीची रक्कम १५ हजार रुपये आणि किमान आधारभूत किमतीवर (एमएसपी) २० टक्के अनुदान, हे दुसऱ्या क्रमांकाचे आश्वासन आहे. एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार या त्रयीच्या छायाचित्रांसह हा वचननामा प्रसिद्ध झाला होता. तेव्हासुद्धा अर्थमंत्री असूनही मूग गिळून गप्प राहिलेल्या अजितदादांना निवडणुकीनंतर 'अंथरूण पाहून पाय पसरायचे असतात,' असा साक्षात्कार झाल्याचे दिसते. आता कर्जमाफीच्या विषयावरून निरनिराळ्या कोलांटउड्या मारणाऱ्या महायुतीच्या नेत्यांमध्ये सर्वात लक्षवेधी ठरले कृषिमंत्री माणिकराव कोकाटे. शेतकऱ्यांशी संबंधित खात्याचे मंत्री असूनही 'शेतकरी कर्जमाफी हा विषय आपला नाहीच,' असे सांगून त्यांनी मुख्यमंत्री-उपमुख्यमंत्र्यांकडे बोट दाखविले. इतकेच नव्हे, तर 'हा विषय आपण ऐकलाच नाही,' अशीही पुस्ती त्यांनी जोडली आहे. माजी मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनाही असेच व्यासपीठावर शेजारी बसलेल्यांची वादग्रस्त वक्तव्ये ऐकू येत नसत, याची या निमित्ताने आठवण होते. राजकारणात हल्ली बोलताना तोंडावर ताबा नसला तरी खपून जाते; कानांवर मात्र कृषिमंत्र्यांसारखे नियंत्रण हवे !

राज्यात बळीराजाची अवस्था बिकट आहे, यात शंकाच नाही. एकीकडे खते-बियाणे, कीटकनाशके आणि कृषिसाहित्याचे दिवसेंदिवस वाढणारे दर, मजुरीच्या दरातील वाढ; तर दुसरीकडे वेगाने कोसळणारे पिकांचे भाव हे चित्र शेतकऱ्यांच्या पाचवीला पुजले आहे. वेळोवेळी येणाऱ्या नैसर्गिक आपत्ती अडचणींत भरच घालतात. नापिकी आणि कर्जबाजारीला कंटाळून राज्यात दररोज शेतकरी मरणाला जवळ करत आहेत. अशा वेळी त्याला दिलासा देण्यासाठी तातडीचे आणि दीर्घकालीन, अशा दोन्ही उपायांची गरज आहे. दीर्घकालीन उपायांमध्ये सिंचनाच्या व्यवस्था बळकट करणे, शेतीची उत्पादकता वाढवणे, खते-बियाण्यांसह नवे तंत्रज्ञान सर्वसामान्यांच्या आवाक्यात आणणे, यांसह सर्वांत महत्त्वाचे म्हणजे शेतीमालाला पुरेसा दर देणे अतिशय महत्त्वाचे आहे. तातडीच्या उपायांमध्ये कर्जमाफीचा पर्याय पूर्वीपासून काही अभ्यासकांकडून मांडला जातो. यापूर्वी सन १९९० मध्ये व्ही. पी. सिंह सरकारने दिलेली माफी, त्यानंतर सन २००८ मध्ये संयुक्त पुरोगामी सरकारने दिलेली ७१ हजार कोटी रुपयांची सर्वात मोठी कर्जमाफी, यांबरोबरच देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री असताना आणि नंतर उद्धव ठाकरे यांच्या कार्यकाळात अशा मोठ्या कर्जमाफी योजना झाल्या. त्यातून शेतकऱ्यांचे सर्वच प्रश्न सुटले नाहीत; मात्र तत्कालीन अडचणींतून त्यांना नक्कीच दिलासा मिळाला आणि पुढील पीककर्ज मिळविण्याचा त्याचा मार्ग मोकळा झाला, हे सर्वच जण मान्य करतात.

आता कर्जमाफीसाठी किमान २० हजार कोटी रुपयांची गरज आहे. लाडकी बहीण योजनेसाठी ३६ हजार कोटी रुपयांची तरतूद असताना कर्जमाफीसाठी इतका निधी उभारणे सरकारला शक्य नाही, हे सध्याचे चित्र आहे; परंतु पूर्वीच्या घोषणांच्या सापळ्यात सरकार अडकल्याचे दिसून येते. त्यामुळे विरोधकांनी अर्थसंकल्पापासूनच त्यावरून हल्ले चढविण्यास सुरुवात केली आहे. अर्थात, सरकारकडे प्रचंड बहुमत असल्याने आश्वासनमाघारीचा राजकीय फटका बसण्याचा संभव कमी. कदाचित पुढील निवडणूक वर्षात त्याचा विचार होऊ शकतो. मात्र, कर्जमाफीबाबत विविध स्तरांत चर्चा सुरू झाली, की अनेक कर्जदार शेतकरी कर्जमाफीच्या आशेने नियमित कर्जांचे हप्ते भरत नाहीत. त्यामुळे विशेषत: बँकांना त्याचा फटका बसतो. आताही रब्बीच्या कर्जांची वसुली रखडली, तर पुढील खरिपात कर्जवाटपासाठी निधीचा प्रश्न उभा राहील. त्याशिवाय अनेक शेतकरी नियमित कर्जफेडीपोटी मिळणाऱ्या व्याजसवलतीच्या लाभापासून वंचित राहणार आहेत. नाही तरी प्रत्येकाच्या खात्यात १५ लाख रुपये, शेतकऱ्यांना मोफत वीज आणि झोपडपट्टीवासीयांना घरे, अशा 'प्रिंटिंग मिस्टेक'ची महाराष्ट्राला सवय आहेच !

# जनसुरक्षा कायद्यास विरोध; पत्रकारांची उद्या मुंबईत निदर्शने

'मुंबई : प्रतिनिधी

अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर निर्बंध आणणाऱ्या प्रस्तावित विशेष जनसुरक्षा विधेयकास एकजुटीने विरोध दर्शवण्यासाठी ३ एप्रिल २०२५ रोजी दुपारी एक वाजता मुंबईतील पत्रकार मुंबई मराठी पत्रकार संघाच्या परिसरात तीव्र निदर्शने करणार आहेत. मुंबईतील १० प्रमुख पत्रकार संघटनांनी एकत्र येत स्थापन केलेल्या ''पत्रकार अभिव्यक्ती संरक्षण मंचा''च्यावतीने दुपारी १ वाजता हे आंदोलन होत असल्याची माहिती पत्रकार अभिव्यक्ती संरक्षण मंचाच्या प्रसिध्दी पत्रकात देण्यात आली आहे.

जनसुरक्षेच्या गोंडस नावाखाली राज्य सरकार लोकांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावरच आक्रमण करू पहात आहे. या कायद्याचा फटका पत्रकार आणि प्रसार माध्यमांना सर्वाधिक बसणार आहे. त्यामुळे पत्रकारांनी पुढाकार घेत कायद्याला ठामपणे विरोध करण्याचा भूमिका घेतली आहे. मुंबईतील दहा प्रमुख पत्रकार संघटनांची एक बैठक नुकतीच मुंबई मराठी पत्रकार संघात पार पडली. या बैठकीत पत्रकार अभिव्यक्ती संरक्षण मंच स्थापन करून या व्यासपीठाच्या माध्यमातून कायद्याला विरोध करणारी चळवळ सुरू करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. त्यानुसार मंचाच्यावतीने लवकरच राज्यपाल, मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन पत्रकारांच्या तीव्र भावना त्यांच्याकडे व्यक्त करण्यात येणार आहेत.

तसेच तुषार खरात आणि राज्यातील अन्य पत्रकारांवर खोटे गुन्हे दाखल करून पत्रकारांची मुस्कटदाबी करण्यात येत असल्याची बाब देखील राज्यपाल आणि मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून देत तुषार खरात व इतर पत्रकारांवरील गुन्हे रद्द करण्याची मागणी केली जाणार आहे. विविध पक्षांच्या प्रमुखांनाही भेटून त्यांनी जनसुरक्षा कायद्यास विरोध करणारी भूमिका घ्यावी अशी त्यांना विनंती केली जाणार आहे.

३ एप्रिलच्या मुंबईतील आंदोलनानंतर राज्यभरही पत्रकार रस्त्यावर उतरतील, त्याची तारीखही लवकरच जाहीर करण्यात येईल, असा इशाराही मंचाच्यावतीने एस.एम.देशमुख, संदीप चव्हाण यांनी दिला आहे.३ एप्रिलच्या आंदोलनात मुंबईतील जास्तीत जास्त पत्रकारांनी सहभागी व्हावे,असे आवाहन मंचाच्यावतीने करण्यात आले आहे.

*पत्रकार अभिव्यक्ती संरक्षण मंच*

*मुंबई मराठी पत्रकार संघ ० मराठी पत्रकार परिषद ० मुंबई प्रेस क्लब ० मंत्रालय आणि विधीमंडळ वार्ताहर संघ ० टीव्ही जर्नालिस्ट असोसिएशन ० पुणे श्रमिक पत्रकार संघ ० बृहन्मुंबई युनियन ऑफ जर्नालिस्ट ० बृहन्मुंबई महानगरपालिका वार्ताहर संघ ० मुंबई क्राईम रिपोर्टर असोसिएशन ० मुंबई हिंदी पत्रकार संघ*

# धुनकवाड येथे अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

वडवणी:प्रतिनिधी

धारुर तालुक्यातील धुनकवाड नं.१ येथे दरवर्षी प्रमाणे याही वर्षी अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात करण्यात आले असून.या सोहळ्याचा आरंभ दि.१ मार्च २०२५ मंगळवार रोजी तर सांगता दि.७ मार्च २०२५सोमवार रोजी होणार आहे.



तरी नामावंत किर्तनकारांचे होणार किर्तन असुन या कार्यक्रमास मोठ्या संख्येने भाविक-भक्तांनी उपस्थित राहावे असे आवाहन ग्रामस्थांनी केले आहे.डोंगरपट्यात धुनकवाड ह्या गावची ओळख धार्मिक क्षेत्रात अग्रेसर असणारे गाव म्हणून आहे.ग्रामदैवत धुनकेश्वराच्या कृपा आशिर्वादाने व वै.ह.भ.प दत्ता महाराज पिंपळनेरकर, ह.भ.प.,वै.ह.भ.प.रघुनाथ महाराज यादव,वै. गुरुवर्य गंगाधर शास्त्री मुळे यांच्या प्रेरणेने गेल्या अनेक वर्षांपासून धुनकवाड येथे भव्य अखंड हरिनाम सप्ताह सुरू आहे.दरवर्षीप्रमाणे याही वर्षी आयोजन करण्यात आले आहे.कार्यक्रमाची रूपरेषा पहाटे ते६ काकडा,६ ते७ विष्णुसहस्त्रनाम व गिता सायं.५ते६ हरिपाठ, सायं,९ ते ११हरिकीर्तन व नंतर सामुदायिक जागर होईल.दि.१ मार्च २०२५ मंगळवार रोजी ह.भ.प.गोविंद महाराज नाईकवाडे यांचे कीर्तन,दि.२ मार्च बुधवार रोजी ह.भ.प.दिपक महाराज मेटे,दि.३ मार्च गुरुवार रोजी विनोदाचार्य ह.भ.प. उध्दव महाराज ठोंबरे,दि.४ मार्च शुक्रवार रोजी ह.भ.प.विठ्ठल महाराज शास्त्री, निळकंठेश्वर संस्थान, वेदांतनगर ,दि.५ मार्च शनिवार रोजी विनोदाचार्य ह.भ.प.शिवदास महाराज जंगले शास्त्री.दि.६ मार्च रविवार रोजी ह.भ.प.कृष्णा महाराज रासवे.दि.७ मार्च सोमवार रोजी ह.भ.प.वसंत महाराज पिंपळनेरकर यांचे दुपारी १ते ३या वेळेत सुश्राव्य वाणीतून काल्याचे किर्तन होईल व नंतर सामुदायिक महाप्रसाद होईल.तरी या अखंड हरिनाम सप्ताहास भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन ग्रामस्थांनी केले आहे.

# खळवट लिमगाव येथे अखंड हरिनाम सप्ताहास प्रारंभ

वडवणी : प्रतिनिधी

खळवट लिमगाव येथे सालाबाद प्रमाणे यावर्षी अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यास ३१ मार्च पासुन सुरुवात झाली आहे. सप्ताह प्रतीवर्षी भक्ती भावाने साजरा करण्याचे हे २० वे वर्षे आहे.

या सप्ताहात दैनिक कार्यक्रम काकडा भजन, विष्णू सहस्त्रनाम, ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, भावार्थ रामायण कथा, ज्ञानेश्वरी प्रवचन, हरिपाठ व रात्री ९ ते ११ वेळेत हरिकिर्तन व नंतर हरिजागर होणार आहे. या सप्ताहात सोमवार, दि.३१/ ०३/ २०२५ श्री.ह.भ.प. सिताराम महाराज रोडगे (रवळगावकर) मंगळवार, दि.०१/०४/२०२५ श्री.ह.भ.प. ज्ञानेश्वर महाराज बादाडे



,(काडीवडगावकर) बुधवार, दि.०२/०४/२०२५ श्री.ह.भ.प. कृष्णा महाराज मिटे (सोपारा) गुरुवार, दि.०३/०४/२०२५ श्री.ह.भ.प. महादेव महाराज चाकरवाडीकर (श्रीक्षेत्र चाकरवाडीकर),शुक्रवार, दि.०४/०४/२०२५ श्री.ह.भ.प. वैभव महाराज जगताप (पांडेपोखरी)शनिवार, दि.०५/०४/२०२५ श्री.ह.भ.प.अक्षय महाराज पवार (रामपुरीकर)

शनिवार, दि.०५/०४/२०२५ रोजी श्रीरामजन्मोत्सवनिमित्त सकाळी १० ते १२ श्री.ह.भ.प. १००८, वेदांताचार्य महामंडलेश्वर हरिष चैतन्य महाराज (टाकळगव्हाण) यांचे किर्तन होईल .तर साय रात्री ९ ते ११ ह.भ.प.समाज प्रबोधनकार. शिवचरित्रकार कृष्णा महाराज कुन्हे (कांबी - शेगाव) तर दि.७ रोजी वार सोमवारी ह.भ.प. विष्णु महाराज जगताप (गिता मंदीर, पैठण कर)यांचे काल्याचे होणार आहे. तरी सर्व भाविक भक्तांनी या सर्व कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे खळवट लिमगावच्या भाविक ग्रामस्थांनी केले आहे.



# ॲड.तांदळे यांच्या नोटरी कार्यालयाचे उद्घाटन

बीड : प्रतिनिधी

बीड येथील जिल्हा व सत्र न्यायालयात गेली २५ वर्ष वकिली व्यवसायात कार्यरत असलेले सुपरिचित विधीज्ञ तथा जिल्हा व सत्र न्यायालय बीड येथील अतिरिक्त जिल्हा सरकारी विधीज्ञ अजयजी तांदळे नाना यांचे नोटरी कार्यालयाचा शुभारंभ ज्येष्ठ विधीज्ञ गुरुवर्य एस. आर. तांदळे साहेब यांचे शुभ हस्ते गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर संपन्न झाला.

याबाबत अधिक माहिती अशी की, भारत सरकारच्या वतीने अडवोकेट अजय तांदळे यांना नोटरी प्रदान करण्यात आली त्या अनुषंगाने साडेतीन मुहूर्ता पैकी एक अश्या गुढीपाडव्याच्या दिवशी त्यांच्या नोटरी विधीज्ञ कार्यालयाचा शुभारंभ बीड जिल्हा न्यायालय परिसरामध्ये जिल्ह्यातील जेष्ठ विधीज्ञ गुरुवर्य श्रीमंतराव रंगनाथराव तांदळे यांचे शुभ हस्ते फीत कापून, पेढे हार तुरे देऊन संपन्न झाला, याप्रसंगी जिल्हा सरकारी विधीज्ञ एडवोकेट अजयजी राख साहेब, तसेच कार्यकारी अभियंता तोंडे साहेब,ॲड.प्रवीण राख, ॲड.अनिल तिडके, ॲड. बिरांगल, ॲड. मस्कर आदी आणि बीड शहर बचाव मंचचे पदाधिकारी नितीन जायभाये, देशमुख काका तसेच बीड जिल्हा न्यायालयात वकिली व्यवसाय करणारे अनेक वकील बंधू हजर होते, याप्रसंगी सर्वांनी आपले थोडक्यात मनोगत व्यक्त करून अजय तांदळे यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आणि त्यांच्याबद्दल गौरव उद्गार काढून त्यांच्या नोटरी कार्यालयाच्या शुभारंभास देखील शुभेच्छा दिल्या.या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन बीड येथील विधीज्ञ अनिल बारगजे यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री सारूक साहेब , चराठा यांनी केले, यावेळी अनेक पक्षकार बंधू, आणि मित्र गण उपस्थित होते.

# कल्याण कुलकर्णी यांची रोटरीच्या सहाय्यक प्रांतपालपदी निवड

बीड : प्रतिनिधी

वर्षे २०२५ -२६ रोटरी वर्षासाठी रोटरीचे सहाय्यक प्रांतपाल म्हणून बीड रोटरी क्लबचे माझी अध्यक्ष कल्याण कुलकर्णी यांनी त्यांच्या अध्यक्षीय काळात रोटरीचे काम करीत रोटरीचे प्रतिमा उंचाविण्याचे काम केले त्या मुळे त्यांच्या कामाची दखल घेऊन रोटरी प्रांतपाल सुधीर लातुरे यांनी त्यांची निवड केली .तर केज क्लबचे सदस्य प्रवीण देशपांडे यांची निवड रोटरी प्रांतपाल सुधीर लातुरे यांनी केली आहे



जुलै मध्ये नवीन रोटरीवर्ष सुरू होते या वर्षाकरिता ही निवड करण्यात आली रो कल्याण कुलकर्णी यांच्या कडे जिल्ह्यातील रोटरी क्लब बीड मिडटाऊन ,बीड सिटी तसेच वडवणी आणि माजलगाव सिटी या क्लबचे रोटरी अध्यक्ष संचालक मंडळास सोबत काम करतील तर देशपांडे यांच्या कडे रोटरी क्लब बीड ,कळंब आणि अंबाजोगाई येथील क्लब सोबत रोटरीचे काम करतील रोटरी समाजातील तळागाळातील घटकांसाठी काम करते तसेच शैक्षणिक व आरोग्य क्षेत्रातील वंचित घटकांना रोटरीचा फायदा व्हावा यासाठी हे दोन्ही सहाय्यक प्रांतपाल रोटरीच्या माध्यमातून मदत करतील आणि आपली निवड सार्थ ठरवतील असा विश्वास प्रांतपाल सुधीर लातुरे यांनी व्यक्त केला.रो कल्याण कुलकर्णी आणि रो प्रवीण देशपांडे यांचे स्वागत होत आहे.

# चिंचोटी येथील तात्यासाहेब गोंडे यांचे आपघाती निधन

वडवणी: प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील चिंचोटी येथील वारकरी संप्रदायातील तात्यासाहेब पाटील व गोंडे वय वर्ष ८४ यांचे अँपे रिक्षा पल्टी होऊन निधन झाले तर त्यांच्या पत्नी पार्वतीबाई गोंडे या गंभीररीत्या जखमी झाल्या आहेत. त्यांना ऊपचारासाठी बीड येथील खाजगी हॉस्पीटल दाखल करण्यात आले आहे.शिंदे शिवसेनेचे वडवणी तालुका प्रमुख युवराज गोंडे यांचे ते वडील होते.



तात्यासाहेब गोंडे व त्यांच्या पत्नी वडवणी येथे हॉस्पीटलला आले होते.त्यांचे हॉस्पीटलचे काम ऊरकुन चिंचोटी कडे अँपे रिक्षा क्रमांक एम एच २३ एच ७३३८ जात आसतांना बीड परळी राष्ट्रीय महामार्गावर ओमकार पेट्रोल पंपा जवळ रिक्षा पल्टी होऊन तात्यासाहेब पाटीलबुवा गोंडे यांचे निधन झाले.यामध्ये त्यांच्या पत्नी पार्वतीबाई गोंडे या गंभीर जखमी झाल्या आहेत.त्यांना उपचारासाठी बीड येथील खाजगी हॉस्पीटलला दाखल करण्यात आले आहे.

ते शिंदे शिवसेनेचे तालुका प्रमुख युवराज गोंडे यांचे ते वडील होते.त्यांच्या पश्चात दोन मुली एक मुलगा नातु पंतु असा मोठा परीवार आहे.त्यांच्यावर चिंचोटी येथील हिंदु स्मशान भुमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. अस्ती विसर्जन गुरुवार दि ३ एप्रील रोजी सकाळी ७:३० वाजता होणार आहे.गोंडे परीवाराच्या दुःखात डोंगरचा राजा परीवार सहभागी आहे. त्यांच्यावर चिंचोटी येथील हिंदु स्मशान भुमीत अखेरचा निरोप देण्यात आला.

# माजलगाव येथे सैलानी बाबा संदल, यात्रा उरूस

माजलगाव:प्रतिनिधी

शहराजवळील असलेल्या ढोरगाव-हिंगणवाडी शिवारात सैलानी बाबा यांचे दर्गा परिसर येथे दिनांक ०२ एप्रिल वार बुधवार रोजी सैलानी बाबा संदल व उरूसचे आयोजन करण्यात आले आहे. याचा लाभ भक्तांनी घ्यावा असे आवाहन यात्रा महोत्सव समितीचे अध्यक्ष विशाल गायकवाड यांनी केले आहे.

या दर्ग्याच्या दर्शनासाठी जिल्हा व राज्यभरातून विविध जाती धर्मातील भाविकांची मोठी उपस्थिती दरवर्षी असते. सकाळी ०९ ते सायंकाळी १० वाजेपर्यंत भाविक भक्तांचि दर्शनासाठी आलोट गर्दी पाहायला मिळते. व तसेच महाप्रसादाचा कार्यक्रम सकाळी १०:०० ते सायंकाळी ०५ वाजेपर्यंत राहील. बाबुदादा राजेभाऊ गायकवाड पुजारी मोगरेकर फरशी कारखान्याजवळ, देवखेडा नांदुर, माजलगांव जि.बीड यांच्या घरून दि.०२ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी संदल बायपासने निघुन आंबेडकर चौकातून त्याच दिवशी रात्रौ ९.३० वाजता सैलानी बाबांच्या दर्गा येथे पोहचते.



# वडवणी ते शिखर शिंगणापुर मोठा महादेव पायी दिंडी रवाना

वडवणी :प्रतिनिधी

दरवर्षी प्रमाणे यावर्षी चैत्र एकादशी निमीत्त वडवणी येथून पायी दिंडी रवाना .. आज दिनांक ३० /०३ /२०२५ रविवार रोजी वडवणी येथून पायी दिंडी रवाना झाली.वडवणी ते शिखर शिंगणापूर पायी दिंडी सोहळा वडवणी येथील कै.किसन बाबा ओतारी यांनी ४५ वर्षा पूर्वी पायी दिंडी सोहळ्याना सुरूवात केली होती.आज त्यांच्या आशीर्वादाने दिंडी चालक म्हणून गेणाबापु पाटोळे व दिनकर फड यांच्या मार्गदर्शनाखाली दिंडी चे नियोजन केले जाते.यादिंडी मध्ये शंभो महादेव फक्त घोडके नाथा यांची कावड, शिवाजी पाटोळे कावड,दिनकर फड यांची काठी , गोरख घोडके यांची शंभू महादेव ची काठी ,कावड असते . पहिला मुक्काम चिखल बीड, दुसरा एकुरका, तिसरा मुक्काम जवळुका, चौथा मुक्काम भुम पाचवा मुक्काम शेंद्री,सहावा मुक्काम कदम वस्ती ,सातवा मुक्काम टेंभुर्णी,आठवा मुक्काम गायकवाड वस्ती , नववा मुक्काम नातेपुते , दहावा मुक्काम शिखर शिंगणापूर येथे होईल. या दिंडीत पायी जाणारे शिवभक्त शंकर झाडे, , बबन भुजबळ, आसाराम आवचर, सुनील डिगे ,श्रीकिसन घोडके, चैतन्य राऊत ,पपू दावडकर, प्रदीप पाटोळे,महादेव पंधारे,गोरख घोडके, प्रदिप घोडके,राहुल दिवटे ,कोंडीराम गुरसाळी, विकास फड, आकाश फड,नाना अंधारे, दत्तात्रेय करळे, तुकाराम चौरे,डिंगाबर जाधव, रवि शिंदे, सअसंख्य शिवभक्त दिंडीत उपस्थित होते.

साप्ताहिक
# डोंगरचा राजा
बुधवार, दि. २ एप्रिल २०२५ । पान ३







# पतंगे बंधू परत जिद्दीने यशोशिखरावर विराजमान होतील

वडवणीः प्रतिनिधी

वडवणी तालुक्यात नामांकित असलेल्या पतंगे ट्रेडर्सला काही दिवसांपूर्वी झालेल्या अग्नीतांडवाच्या दुर्घटनेला अवघे काही दिवसंच लोटले असतानाही प्रामाणिकपणा, मेहनत व नव्याने शून्यातून विश्व निर्माण करण्याची जिद्द बाळगणारे पतंगे बंधू यांनी परत एकदा त्याच उमेदीने वडवणी शहरातील बीड-परळी राज्य महामार्गावरील आंधळे पेट्रोल पंप शेजारी आपले पतंगे ट्रेडर्स या दालनाची नव्याने उभारणी करुन त्याचा शुभारंभ रविवारी गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर करण्यात आला असून दरम्यान पतंगे बंधू परत एकदा त्याच जिद्दीने यशाच्या यशोशिखरावर विराजमान होतील अशा भावना याप्रसंगी भेटी देणाऱ्या विविध मान्यवरांनी व्यक्त केल्या.

वडवणी तालुक्यातील बांधकाम, फर्निचर व कलर यासह सर्व साहित्यांचे परिपूर्ण व नामांकित दालन असलेल्या पतंगे ट्रेडर्स या दुकानाला काही दिवसांपूर्वीच भयानक अशी अचानक आग लागल्याने या अग्नीतांडवात अगदी होत्याचे नव्हते झाले. मागील २५ वर्षांपासून मोठ्या कष्टातून व प्रामाणिकपणे उभारलेल्या या वैभवाची राख होतांना सर्वांनी हताश होवून पाहिले. यात त्यांचे झालेले नुकसान कधीही भरुन न येण्याजोगे व न मोजण्याजोगे असेच आहे. मात्र असे असतांनाही, या दुर्घटनेने खचून न जाता, खचतील ते पतंगे कसले. याप्रमाणे या पतंगे परिवारातील कुटुंबप्रमुख विलासराव पतंगे, व त्यांची दोन्ही मुले



विशाल पतंगे व विवेक पतंगे यांनी दुर्घटनेच्या दुसऱ्याच दिवशी परत एकदा रिस्टार्ट करण्याचा मनामध्ये संकल्प केला. आणि मागील २५ वर्षांपूर्वी ज्याप्रमाणे आपण शून्यातून सुरुवात केली अगदी त्याचप्रमाणे परत एकदा शून्यातून विश्व निर्मिती करण्याची इच्छाशक्ती मनाशी बाळगून वडवणी शहरातील बीड-परळी राज्य महामार्गावरील आंधळे यांच्या पेट्रोल पंप शेजारील गाळ्यांमध्ये आपले पतंगे ट्रेडर्स हे दालन स्थलांतर करुन त्याच ठिकाणी दिनांक ३० मार्च २०२५ रविवार रोजी गुढीपाडव्याच्या शुभ मुहूर्तावर याचा आपल्या आई-वडिलांच्या शुभहस्ते शुभारंभ केला. याप्रसंगी पतंगे परिवारावर निष्णात प्रेम करणारे त्यांचे स्नेहीजन, कुटुंबीय, आप्तेष्ट, मित्रपरिवार व व्यापारी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. या सर्वांनी त्यांच्या या पुन्हा एकदा नव्याने सुरुवात केलेल्या रिस्टार्टचे भरभरुन कौतुक केले व त्यांच्या जिद्द आणि चिकाटीला सलाम केला. हेच पतंगे बंधू परत एकदा जिद्दीने यशाच्या यशोशिखरावर विराजमान होतील अशा भावना याप्रसंगी भेटी देणाऱ्या विविध मान्यवरांनी व्यक्त केल्या. शेवटी सर्व उपस्थितांचे आभार पतंगे कुटुंबियांच्या वतीने मानण्यात आले.



# वडवणीत हिंगलाज माता प्रगटदिन उत्साहात

वडवणी : प्रतिनिधी

भावसार समाजाची कुलदैवत असलेल्या श्री हिंगलाज माता प्रकट दिन ज्ञानोबा-तुकाराम, हिंगलाज माता की जय, महिला वर्ग फुगड्या खेळत व चौका चौकात फटाक्यांच्या अतिष बाजी करत वडवणी भावसार समाजाकडून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शहरातील हिंगलाज माता मंदिरात मुख्य कार्यक्रम संपन्न झाला या कार्यक्रमास शहरातील सर्व समाज बांधव विशेषता महिलांची मोठी गर्दी होती. यावेळी हिंगलाज माता प्रकट दिनाचे मुख्य आकर्षण होते वारकरी श्री संत ज्ञानेश्वर महाराज शिक्षण संस्था येथील बाल वारकरी भक्ती मंडळ यांच्या टाळ, मृदंग व ज्ञानोबा तुकाराम च्या जय घोषणांनी वडवणी करांचे लक्ष वेधून घेतले.


भावसार समाजाचे दैवत असलेल्या श्री हिंगलाज माता प्रकट दिनानिमित्त शहरातील भावसार समाजाच्या वतीने विविध कार्यक्रमाच्या आयोजन करून मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला यामध्ये सकाळी आठ वाजता श्री हिंगलाज मातेचा अभिषेक करण्यात आला त्यानंतर श्रीहिंग्लज मातेची पालखी मिरवणूक (शोभा यात्रा )संपूर्ण शहरात सर्व समाज बांधव, महिला , युवक यांच्या उपस्थित वारकरी श्री संत ज्ञानेश्वर महाराज वारकरी शिक्षण संस्था येथील सर्व वारकरी बाल भजनी मंडळाच्या उपस्थितीमध्ये ज्ञानोबा-तुकाराम, हिंगलाज माता की जय घोषणा देत व चोका -चौकात फटाक्यांची आतिषबाजी, फुगड्या चा आनंद घेत भक्तीमय वातावरणात पालखी मिरवणूक काढण्यात आली मिरवणूक नंतर १२:३०वाजता हिंगलाज मातेची महाआरती महाप्रसाद चे यजमान श्री ह.भ.प. ज्ञानोबा (माऊली)जर्नादन बेदरकर महाराज व प्रकाश सुखदेव गार्डी यांच्या हस्ते करण्यात आली. दुपारी एक ते चार या वेळेत महाप्रसादाचा कार्यक्रम संपन्न झाला. हिंगलाज माता प्रकट दिनानिमित्त विविध कार्यक्रमास भावसार समाज बांधव , शहरातील प्रतिष्ठित नागरिक, राजकीय, सामाजिक, क्षेत्रातील मान्यवर, पत्रकार , मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शहरातील अशोकनगर भागातील सोन्या चांदीचे दागिने चोरून नेले

माजलगाव :प्रतिनिधी

येथील सम्राट अशोकनगर भागातील कुशाग्र महेश लऊळकर,यांचे घरी दि.२८/ ०३ /२०२५ रोजी रात्री ०१.३० ते ६ वा.चे पूर्वी घरातील लोखंडी कपाटामध्ये ठेवलेले सोन्याचे व चांदीचे दागीने,मोबाईल व पासपोर्ट हे कोणीतीर अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून घराची कडी उघडून लोखंडी कपाटाचे लॉक उघडून आत ठेवलेले सोन्या चांदीचे दागीने चोरून घेऊन गेले आहे.

कुशाग्र महेश लऊळकर,हे वरील ठिकाणचा राहणारे असून जयमहेश कारखाना येथे इलेक्ट्रीक इंजिनियर म्हणुन काम करतात.ते जय महेश कारखाना येथून ड्युटी करून रात्री अंदाजे ११वा.चे सुमारास घरी आले.खालच्या एका रुमची कडी लावून खालीच समोरील रुममध्ये झोपी गेले होते.रात्री अंदाजे ०१.३० ते पहाटे ०५.३० वा.चे दरम्यान सगळेजण झोपी गेलोत. त्यानंतर त्यांची पत्नी सकाळी ०६.०० वा.चे सुमारास जाग आल्याने उठून बाहेर आली व पाहीले असता तिला समोरील रुमची कडी उघडी दिसली. त्यावर तिने फिर्यादीस उठवीले व ते दोघे रुम मध्ये जावून पाहीले असता कोणीतरी अज्ञात चोरट्याने घराचे लोखंडी गेट वरून येऊन घरात प्रवेश केला असावा. कुटुंबातील लोक झोपलेल्या घरा समोरील रुमची कडी उघडून आतप्रवेश करून कपाट उघडून कपाटात ठेवलेले



सोन्या चांदीचे दागीने एका कापडी पिशवी मध्ये ठेवलेले ते चोरून घेऊन गेले. सदर सोन्या चांदीचे दागीने वर्णन खालील प्रमाणे

एक सोन्याचे गंठन १५ ग्रॅम वजनाचे प्रति ग्रॅम किं.अं ३००० रुपये प्रमाणे एकुण किं.४५०००/-रुपये,एक जोड सोन्याचे कानातील तनिष्क प्रती ग्रॅम३०००रुपये प्रमाणे एकुण किं.अ१५०००/- रुपये, तिन सोन्याचे नथ एक ग्रॅम वजनाचे प्रति ग्रॅम किंमत अं.३००० रुपये प्रमाणे एकुण किं.९०००/-रुपये,चांदिचे चैन व बाजुबंद किंमत ३००० रुपये,एक विवो कंपनीचा मोबाईल मॉडेल नं १९१७ ज्याचा आयएम ई आयन ८६८८६००४७८८ ४११७,८६८८६००४७८८४१०९ असा असलेला जुना वापरता किंमत अं.२००० रुपये, पासपोर्ट असा एकूण ७४०००/- रुपयाचा माल.तरी दि.२८/०३/२०२५ रोजी रात्री ०१.३० ते ०६.०० वा.चे पूर्वी घरातील लोखंडी कपाटा मध्ये ठेवलेले वरील वर्णनाचे व किंमतीचे सोन्याचे व चांदीचे दागीने,मोबाईल व पासपोर्ट हे कोणीतीर अज्ञात चोरट्याने घरात प्रवेश करून घराची कडी उघडून लोखंडी कपाटाचे लॉक उघडून आत ठेवलेले सोन्या चांदीचे दागीने चोरून घेऊन गेले आहे.अज्ञात चोरट्या विरुध्द

गुन्हा रजि.नं.०१२७/२०२५,(भारतीय न्याय संहिता (बीएनएस),२०२३,३३१(४), ३०५() गुन्हे दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास पी.पी.मुंडे हे करत आहेत.



# राष्ट्रमाता, राजमाता जिजाऊंच्या रथयात्रेचे शहरात भव्य स्वागत

वडवणी :प्रतिनिधी

वेरूळ येथून निघालेली राष्ट्रमाता जिजाऊंची रथयात्रा गुढीपाडव्याच्या दिवशी दुपारी वडवाणी शहरात दाखल झाली. यावेळी वडवणी शहरातील सर्व नागरिकांनी रथयात्रेचे जल्लोषात अन्? फटाक्याच्या आतिषबाजीत स्वागत केले..

१८ मार्च पासून वेरूळ येथील मालोजीराजे भोसले गडावरून ही रथयात्रा सुरू झाली. महाराष्ट्रामध्ये सुमारे ४५ दिवस ही रथयात्रा फिरणार आहे. राज्यातील सुमारे ३६ जिल्ह्यामध्ये सुमारे सात हजार किलोमीटरचा या रथयात्रेचा प्रवास असणार आहे. या रथयात्रेच्या माध्यमातून सामाजिक सलोखा निर्माण करण्याचा प्रयत्न मराठा सेवा संघ आणि संभाजी ब्रिगेड च्या वतीने केला जात आहे. संभाजी ब्रिगेडचे महाराष्ट्राचे महासचिव शिवश्री सौरभ खेडेकर, मराठा सेवा संघाचे प्रदेश मार्गदर्शक अर्जुन तनपुरे, मराठा सेवा संघाचे प्रदेश उपाध्यक्ष शिवश्री संदिपान जाधव तसेच जिजाऊ ब्रिगेडच्या प्रदेशाध्यक्ष सीमाताई बोके, जिजाऊ ब्रिगेड प्रदेश उपाध्यक्ष वर्षाताई माने,शाहीर राजेंद्र खुडुसकर, शाहीर पाटील असे अनेक राज्यस्तरीय मान्यवर एकत्र येऊन ही रथयात्रा सुरू करण्यात आलेली आहे.

गुढीपाडव्याच्या दिवशी रथयात्रेचे बीड जिल्ह्यामध्ये आगमन झाले. मराठा सेवा संघाचे बीड जिल्हाध्यक्ष नागनाथ जाधव पुरुषोत्तम जाधव, जिजाऊ ब्रिगेडच्या जिल्हाध्यक्ष राधाताई सपकाळ, तालुका उपाध्यक्ष उषा अंभोरे, तालुका कार्याध्यक्ष नीता मात्रे यांनी जिजाऊ रथयात्रा यशस्वी होण्यासाठी पुढाकार घेतला. दुपारी साडेबारा वाजता रथ यात्रा वडवणी शहरात दाखल झाली. यावेळी वडवणी तालुक्यातील विविध क्षेत्रातील नागरिकांनी रथयात्रेचे फटाक्याची आतिषबाजी मध्ये भव्य स्वागत केले. यावेळी वडवणी शहरातील अनेक मान्यवर कार्यक्रमासाठी उपस्थित होते.

# वडवणी ते थेटेगव्हण रस्त्यासाठी थेटेगव्हण फाटा येथे रास्ता रोको आंदोलन



वडवणीःप्रतिनिधी

वडवणी ते थेटेगव्हण व चिंचवण - कोठरबन-चोरांबा या रस्त्यासाठी थेटेगव्हण फाटा येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे दि.४एप्रिल २०२५शुक्रवार रोजी सकाळी १०वा.रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे तरी डोंगरपट्ट्यातील नागरिकांना या रास्तारोको आंदोलनास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात येत आहे.वडवणी ते थेटेगव्हाण व चिंचवण-कोठरबन-चोरांबा ह्या रस्ता अत्यंत खराब झाला असून या रस्त्यावर मोठ-मोठे खड्डे पडले असून या रस्त्याकडे लोकप्रतिनिधीचे दुर्लक्ष असून यामुळे या डोंगरपट्ट्यातील लोकांना व वाहनधारकांना त्रास सहन करावा लागत आहे. वडवणी ते थेटेगव्हण हा रस्ता डोंगरपट्ट्यातील नागरीकांसाठी दळणवळणाचा आहे.व हा रस्ता वडवणी व धारुर या दोन तालुक्याला जोडणारा रस्ता आहे.आणी ह्याच रस्त्यावर मोठ मोठे खड्डे पडले असल्याने ह्या रस्त्याची दुरवस्था झाली आहे यामुळे वाहनधारकांना वाहन चालवताना तारेवरची कसरत करावी लागत आहे.तर काही वाहनधारक तर तेलगाव मार्गे जात असल्याने त्यांना आर्थिक भुर्दंड सोसावा लागत आहे.तरी शासनाचे या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी दि.४/४/२०२५ शुक्रवार रोजी सकाळी १० वा.थेटेगव्हण फाटा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथे चिंचवण,पहाडी दहिफळ, पहाडी पारगाव, धुनकवाड,चारदरी व कोठारबन येथील ग्रामस्थ रास्तारोको आंदोलन करणार आहोत.तरी डोंगरपट्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात येत आहे.







**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.१८/०२/२०२५ फा.क्र.१६१/२०२५

अर्जदाराचे नाव १) श्री. कालीदास मिठुराव वाघ

विक्री किंवा नावे करुन देणा-याचे नाव श्रीमती. कमल परमेश्वर कवचट

प्रकरणः नावनोंदणी बाबत घर क्र. सर्वे नं./ गट क्र.४१५ प्लॉट नं.१० मिळकत क्र. वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जाहीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारसा / वाटणीपत्र या कार्यालयातील मालमत्ता कर रजिस्टर ला घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चतुःसिमा खालील प्रमाणे आहे.

आकारः १) लां. पुर्व पश्चिम १३.७५मी. व रुं. दक्षिणोत्तर ०९.३० मी. एकुण क्षे.१२७.८७ चौ.मी.

पुर्वः-प्लॉट नं.१५, पश्चिमः-०९ मीटर रस्ता, दक्षिणः- प्लॉट नं. ११, उत्तरः- प्लॉट नं.०९

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहीरनामा प्रसिध्द केल्यापासून मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या आक्षेप अर्जावर विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.२१/०३/२०२५

अर्जदाराचे नाव - श्री. संतोष रघुनाथ नागरगोजे

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव श्री. रघुनाथ पंढरीनाथ नागरगोजे

प्रकरण : नाव नोंदणी बाबत मिळकत क्र. ३७१४ वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार- पुर्वपश्चिम १०० फुट दक्षिणोत्तर ३० फुट एकुण ३००० चौ. फुट पश्चिम बाजूने पुर्वपश्चिम २० फुट दक्षिणोत्तर ३० फुट एकुण ६०० चौ. फुट

पुर्व - शिल्लक जागा, पश्चिम - ईरशाद हमीद शेख

दक्षिण - शिंपले यांचा प्लॉट, उत्तर - २० फुटाचा रस्ता

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,नगरपंचायत, वडवणी**

**जाहिरनामा**

**नगरपंचायत वडवणी जि. बीड.**

दि.२५/०३/२०२५

अर्जदाराचे नाव - श्री. संतराम सक्रु राठोड

विक्री किंवा नावे करुन देणाऱ्याचे नाव श्री. तोळाराम सक्रु राठोड

प्रकरण : नाव नोंदणी बाबत मिळकत क्र. १४ वडवणी येथील आहे.

सर्व जनतेस जारीर करण्यात येते की, वरील अर्जदाराने या कार्यालयात वरील घर नंबरवर खरेदीखत / वारस प्रमाणपत्र आधारे या कार्यालयातील मालमत्ता कर आकारणी नोंद मध्ये नोंद घेणेबाबत अर्ज दिला आहे. ज्याची साईज व चर्तुः सिमा खालीलप्रमाणे आहे.

आकार- पश्चिम बाजूने १५ फुट दक्षिणोत्तर १३.५ फुट एकुण क्षेत्रफळ ४१० चौ. फुट

पुर्व - सुखदेव सोमा पवार, पश्चिम - रस्ता

दक्षिण - नारायण धोंडीराम राठोड, उत्तर - केशव सक्रु राठोड

याबाबत कोणास आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द केल्यापासुन मालकी हक्काच्या लेखी पुराव्या सह पंधरा दिवसाच्या आत आक्षेप अर्ज सादर करावा. मुदतीनंतर आलेल्या विचार केला जाणार नाही.

**मुख्याधिकारी,**
**नगरपंचायत, वडवणी**

साप्ताहिक
डोंगरचा राजा
बुधवार, दि. २ एप्रिल २०२५ । पान ४

# प्रभू श्रीराम जन्मोत्सवाची आजीने सुरुवात केली; नातवाने दिलं सामाजिक स्वरुप

## ईश्वर तांबडे यांच्या कुटुंबाने ६० वर्षापासून परंपरा जोपासली





चिंचवण:प्रतिनिधी

साधारण गेल्या ६० वर्षापुर्वी कुंटुबात आज्जीने श्रीराम जन्मोत्सवाची सुरुवात केली. यानंतर लेकाने देखील शेती व्यवसाय संभाळत हा वारसा जपत ठेवत ठेवला. तर आता नातंव देखील उच्चशिक्षित होऊन हि परंपरा अखंडितपणे सुरु ठेवली. मोठ्या भक्तीभावाने आणि निस्वार्थपणे श्रीरामाचा जन्मोत्सव मोठ्या थाटाने किर्तन आणि महाप्रसादाचा कार्यक्रमाची सेवा देत हि परंपरा जोपसत आहेत. हि किमया चिंचवण येथील ईश्वर तांबडे यांच्या कुंटुबाने समजासह पंचकृशित या परंपरने आदर्श देखील निर्माण केला आहे.

वडवणी तालुक्यातील मौजे चिंचवण येथील रहिवाशी नानाभाऊ आणि केराबाई तांबडे हे दाम्पत्य शेतीचा व्यवसाय करुन त्याकाळी कुंटुबाचा उदारनिर्वाह करत असत. केराबाई तांबडे या धार्मिक संप्रद्याच्या विचार सरणीच्या होत्या. साधरण ६०-६५ च्या दशकात त्यांनी कुंटुबिक श्रीराम जन्मोत्सव साजरा करण्याचा मानस ठेवला नंतर गांवास्तरावर

जन्मोत्सव करण्याचा ठरवला हि परंपरा केराबाई नानाभाऊ तांबडे यांनी ह्यात असे पर्यत कायम ठेवली. यानंतर त्यांचा मुलगा भगवतराव तांबडे यांनी देखील शेतीचे कष्ठ करत आईनी सुरुवात केलेल्या श्रीराम जन्मोत्सवाची परंपरा निस्वार्थ जोपासली आता नातंवड देखील उच्चशिक्षित झाले. यामध्ये ईश्वर हा नातू व्यवासाय करत समाज आणि राजकरण करत आहे. ते सध्या भाजपा युवा मोर्चाचे वडवणी तालुकाध्यक्ष पदावर विराजमान आहेत. तर दुसरा नातू अंगद हे वडवणी शहरात वैदयकिय सेवा तर पुरुषोत्तम हा बार्शी येथील शासकिय रुग्णालयात सेवा देत आहेत. नोकरी आणि इतर प्रंपचचा संभाळ करत आज्जीने दिलेला धार्मिकतेचा वसा आणि वारसा आज देखील नातू देखील मोठ्या मनाने आणि मोठ्या जिद्दीने वारसा सुरु ठेवण्यात यश मिळवत

आज्जी आणि आजोबांचे नित्यसेवा या श्रीराम जन्मोत्सवातून स्मरण करत आठवणीचा उजाळा संपुर्ण तांबडे कुंटुब करत आसतात. तर यंदा देखील दि.६ एप्रिल २०२५ वार रविवार रोजी चिंचवण याठिकाणी परंपरेनुसार श्रीराम जन्मोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी १० ते दुपारी १२ वाजे दरम्यान नावलैकिक विनोदाचार्य ह.भ.प. प्रकाश महाराज साठे यांचे किर्तन होणार आहे. तर दुपारी १२ ते ३ वाजे दरम्यान महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे. तरी या कार्यक्रमाचा भाविक-भक्तानी मोठ्या संख्येनी उपस्थित राहून लाभ घ्यावा असे आव्हान भाजपा युवा मोर्चाचे वडवणी तालुकाध्यक्ष ईश्वर तांबडे यांनी केले आहे.

### कौंटुबिक समाधान मिळते : ईश्वर तांबडे

आमच्या आज्ञी स्व.केराबाई नानाभाऊ तांबडे ह्या अंत्यत धार्मिक विचारसरणीच्या होत्या त्यानीच या श्रीराम जन्मोत्सवाची सुरुवात केली नंतर वडिलांनी हि परंपरा कायम ठेवली आणि आता आम्ही नातंवड म्हणून या परंपरेला मोठे स्वरुप देण्याचा प्रयत्न करत आहोत. यातून श्रीरामाची भक्ती आणि त्यातून मिळणारे समाधान व आज्ञीने सुरु केलेली परंपरा तिची आठवण स्मरण होते यातूनच समाजिकतेसह कौंटुबिक समाधान मिळते. आणि तिन्ही नातंवड या श्रीराम जन्मोत्सवाची भक्ती मोठ्या भावनेन करत आसतोत अशी प्रतिक्रिया ईश्वर तांबडे यांनी दिली आहे.




# ध्येय : No FILE ONLY LIFE

मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्र फडणवीस साहेबांनी आज रोजी माझी आयुष्यमान भारत मिशन महाराष्ट्र समितीच्या ''अध्यक्षपदी '' विशेष दर्जा व सुविधेसह निवड करत मोठ्या विश्वासाने जबाबदारी सोपवली आहे. सामान्य रुग्ण केंद्रबिंदू मानून

साहेबांनी दिलेल्या संधीचे सोने करतांना गरजवंताला न्याय देण्याचा प्रामाणिक प्रयत्न करणारच आहे यात शंका नाही. समितीचा सुधारित शासन निर्णय निर्गमित करीत असताना प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना या एकत्रित योजनेची अंमलबजावणी करण्याचे अधिकार मला दिले आहेत.

मी मागच्या सरकारमध्ये समितीचा कक्ष प्रमुख या नात्याने एक वर्षामधे राज्यातील २८ जिल्ह्यांचा दौरा केला होता. योजनेमार्फत उपचार होण्यासाठी रुग्णांना व हॉस्पिटलला प्रत्यक्षात येत असलेल्या अडचणी व वास्तव परिस्थिती याचा अभ्यास करत एक छोटासा अहवाल तयार केलेला आहे. योजनेतील अनेक त्रुटी मला मान्य आहेत. २०१३ मध्ये सुरू झालेल्या राजीव गांधी जीवनदायी योजनेचे नंतर २०१४ मध्ये महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना असे नामकरण करण्यात आले. मात्र मागील अकरा - बारा वर्षाच्या काळामध्ये आधुनिक उपचार पद्धती व उपचाराच्या खर्चामध्ये प्रचंड वाढ झाली आहे याचा प्रामुख्याने विचार होणे गरजेचे होते. मात्र तसे झाले नाही, पर्यायाने रुग्णांवर योजनेतून उपचार करण्यासाठी अनेक हॉस्पीटल असमर्थता दर्शवतात. अंगीकृत असलेल्या रुग्णालयाने नाकारलेल्या रुग्णाना प्रत्यक्षात उपचार मिळवून देण्यासाठी मी प्रचंड अभ्यास करुन त्यावर उपाय शोधण्यासाठी संपूर्ण मसुदा तयार केलेला आहे. योजनेच्या पॅकेजचे दर पत्रक यामध्ये अमुलाग्र बदल करावा लागेल, परंतु काही रुग्णालय हे अनेक रुग्णांना नाहक त्रास देत योजनेच्या लाभापासून वंचित ठेवण्याचे प्रकार पण निदर्शनास आले आहेत. एखाद्या योजनेचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत द्यायचं म्हटलं की सुवर्णमध्य साधता आला पाहिजे.

माझ्या डोळ्यासमोर ध्येय आहे रुग्ण आणि रुग्णालय दोन्ही जगले पाहिजेत''.योजनेत असलेल्या त्रुटी मान्य करत माननीय मुख्यमंत्र्यांना सर्व बाबी अवगत केल्यानंतर संदेश दिला आहे की, ''आरोग्याबाबत महाराष्ट्र आता थांबणार नाही''.आयुष्यामध्ये प्रत्येक दिलेल्या जबाबदारीचं सोनं करण्याचा प्रामाणिक प्रयत्न केलाच आहे.. या जबाबदारीचे देखील भान ठेवत सुरुवात म्हणजे देवेंद्रजींनी पालकत्व स्वीकारलेल्या आदिवासी भागातील ''गडचिरोली ''जिल्ह्यापासून करणार आहे. या योजनेच्या अंतर्गत महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील शेवटच्या घटकापर्यंत लाभ देण्यासाठी वाटेल ते परिश्रम करायची तयारी ठेवली आहे. मला ठाऊक आहे, सुरुवातीचा काळ कठीण आहे परंतु अशक्य नाही. येणाऱ्या काळामध्ये काही चांगले व काही कठोर निर्णय घ्यावे लागतील. परंतु माझा हेतू शुद्ध असल्यामुळे अडचणीला पूर्ण ताकदीनिशी सामोरे जाण्याची तयारी आहे.

आज पासून सुरुवात करतोय, वेळ किती लागेल सांगता येत नाही. परंतु आणीबाणीच्या वेळेमध्ये सामान्य व्यक्तींना लाभ देण्याकरिता मा.फडणवीस साहेबांच्या आशीर्वादाने नवे मिशन सुरू करत आहोत.

धन्यवाद ....
मा पंतप्रधान नरेंद्रजी मोदी
मुख्यमंत्री मा.देवेंद्रजी फडणवीस साहेब
उपमुख्यमंत्री मा.एकनाथजी शिंदे साहेब
उपमुख्यमंत्री मा.अजितदादा पवार साहेब
विशेष आभार
मा. रवींद्रजी चव्हाण
मा.आ. अतुलबाबा भोसले.
आयुष्यमान टोल फ्री नंबर
१८००२३३२२००



# हॉटेल राजकमल ग्राहकांच्या सेवेत

वडवणी:प्रतिनिधी

वडवणी मध्ये हॉटेल राजकमल उडपी रेस्टॉरंट, प्युअर व्हेज चा नुकताच शुभारंभ करण्यात आला असून ग्राहकांच्या सेवेत हे हॉटेल रुजू झाले आहे.

याबाबत अधिक वृत्त असे की वडवणी शहरातील बीड परळी हायवे रोडवर असलेल्या लोकशाहीर आण्णाभाऊ साठे चौकामध्ये राजकमल उडपी प्युअर व्हेज रेस्टॉरंट अँड लॉजिंग चा शुभारंभ नुकताच युवा नेते बाबरी मुंडे युवा नेते दादासाहेब मुंडे यांच्या हस्ते फित कापून इतर प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीमध्ये हस्ते करण्यात आला. शुभारंभ प्रसंगी उपस्थित असलेल्या सर्व प्रमुख अतिथींचे स्वागत सत्कार माजी उपनगराध्यक्ष राजेभाऊ पवार त्याचबरोबर माऊली जाधव सह आदींच्या हस्ते करण्यात आले.

# 'महाराणी'चे १४ विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र

वडवणी :प्रतिनिधी

वडवणी येथील महाराणी ताराबाई माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे १४ विद्यार्थी शिष्यवृत्ती साठी पात्रता धारक ठरले या बद्दल संस्कार शिक्षण मंडळाचे संस्थापक कार्यवाह माजी आमदार केशवरावजी आंधळे साहेब यांनी या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

गुणानुक्रमे पात्रता धारक पहिले तीन विद्यार्थी यामध्ये रेडेकर प्रांजल-११८, गुण घेऊन सर्वप्रथम आला .बोंगार्डे वेदिका निरंजन - ११२ गुण घेऊन दुसरी तर दिवटे संस्कृती सचिन - १०६ गुण

घेऊन तिसरी आली. एनएमएमएस पात्रता धारक विद्यार्थी खालीलप्रमाणे बारटक्के सुमित-१०३, गुरसाळी गौरव - ९७, मुंडे गोरख नवनाथ -९४, रोकडे कुणाल -९१, घुमरे श्रीजा- ८६, झाडे श्रावणी-८६, वरवडे जान्हवी - ८२, बोगांर्डे सौजन्य - ७९, चौरे अक्षरा-७५, उजगरे कार्तिक -७४, कप्पे हर्षदा -५९ याप्रमाणे शिष्यवृत्ती साठी पात्र झालेल्या सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन शालेय समिती अध्यक्ष संजयभाऊ आंधळे, संचालक रंजीतभैया धस,

संचालक अशोक भैया आंधळे ,उपप्राचार्य अशोक मस्के, पर्यवेक्षक धाईतिडक पी-एम.,श्री डोईफोडे आर.एस.अर्थ विभाग प्रमुख,

विभाग प्रमुख श्री चव्हाण बी.बी; श्री मंत्रे व्ही-एन. व त्याना मार्गदर्शन करणारी टिम यांनी अभिनंदन केले. प्राचार्य राऊत डी डी व सर्व शिक्षकवृंद यांनी पुढील भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या...!

# ९५ केसेस व ६६ हजार रुपयाचा ठोठावला दंड

परळी :प्रतिनिधी

जिल्हा पोलीस अधिक्षक यांचे मार्गदर्शन आणि जिल्हा वाहतुक शाखेची कटाक्ष नजर यामुळे वाहन चोरी करणार्या आरोपींचे चांगलेच धाबे दणाणले आहे. अशातच परळी वै.येथे वर्षभरापुर्वी चोरीला गेलेले वाहन तपासणीदरम्यान चोरीचे आढळून आल्याने संबंधित आरोपीस वाहनासह पकडून कारवाई करण्यात आली त्यामुळे नागरिकांतून पोलीसांच्या कामांविषयी समाधान व्यक्त केले जात आहे जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी सुभाष, संभाजीनगरचे पोलीस निरीक्षक धनंजय यांच्या मार्गदर्शनाखाली शहर पोलिसांच्या सहकार्याने शहरात कारवाई करत ९५ केसेस करुन ६६ हजाराचा दंड ठोठावला.

# उपोषणकर्त्या कर्मचाऱ्यांचा टाहो,दादा,आपण लक्ष घाला!

बीड :प्रतिनिधी

राज्यातील शाहू-फुले-आंबेडकर अनुसूचित जातीच्या आश्रमशाळा गेल्या अनेक वर्षांपासून आर्थिक संकटात अडकल्या आहेत. शासनाने २०१९ मध्ये १६५ पात्र आश्रमशाळांसाठी १००% अनुदान मंजूर केले, तरीही अद्याप अंमलबजावणी नाही! त्यामुळे शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या अडचणीत आहेत.

गर्मीमध्ये उपोषणाचा नववा दिवस पण शासन अजूनही मूकदर्शक!

रात्री मच्छरांचा त्रास दिवसा उन्हाचा प्रहार, तरीही कर्मचाऱ्यांचे आंदोलन सुरूच!

प्रशासनाने उपोषणकर्त्यांना मंडप काढण्याचे फर्मान हा अन्याय नाही का?

शिक्षक आणि कर्मचाऱ्यांची मागणी १००% अनुदान त्वरित वितरित करावे!

मुख्य मागण्या: १६५ पात्र आश्रमशाळांना १००% अनुदान त्वरित वितरित करावे. शिक्षक व कर्मचाऱ्यांना सेवा सातत्य व संरक्षण द्यावे. विद्यार्थ्यांच्या वसतिगृहांसाठी १००% अनुदान मंजूर करावे. उर्वरित १५७ आश्रमशाळांना देखील अनुदान मंजूर करावे.

उपोषणकर्त्यांना भेटणार का?

आज उपमुख्यमंत्री अजित पवार बीड दौऱ्यावर आहेत. शिक्षक-कर्मचाऱ्यांचे उपोषण नवव्या दिवशीही सुरू आहे. अजितदादा यांनी या समस्येवर तातडीने लक्ष घालावे, अशी कर्मचाऱ्यांची मागणी आहे. मात्र प्रशासनाकडून कोणतीही हमी मिळालेली नाही.

राज्याचे लक्ष अजितदादा काय निर्णय घेणार?

शाहू-फुले-आंबेडकर आश्रमशाळांचे शिक्षक, विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांचे भविष्य अंधारात का टाकले जात आहे? शासनाने तातडीने दखल घेतली नाही, तर आंदोलन आणखी तीव्र केले जाईल! जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी याकडे त्वरित लक्ष द्यावे आणि न्याय मिळवून द्यावा!




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक, **संपादक वाघमारे अनिल श्रीराम** यांनी प्रगती ऑफसेट, पंचशिलनगर, वडवणी, ता.वडवणी जि.बीड - ४३११४४ येथे छापून साप्ताहिक डोंगरचा राजा कार्यालय, मेन रोड, वडवणी, ता.वडवणी, जि.बीड ४३११४४ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले आहे. मो. ९४२२५९१८०५, फॅक्स : ०२४४३-२५७७८८, **निवासी संपादक : डॉ.एल.बी. वाघमारे** (*या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही. वाद वडवणी न्यायालय अंतर्गत)